# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/०९(२०१९-२०)/ 191 दिनांक : १९.१०.२०२१९

**आदेश केस क्र.०९(२०१९-२०)**

| | |
|---|---|
| प्रति,<br>मे. अरविंद कॉटसिन (इंडिया ) मर्या.<br>प्लॉट क्र. १२ सेक्टर ए लक्ष्मी औद्योगिक वसाहत<br>तिळवणी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | अर्जदार |
| विरुध्द | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग इचलकरंजी | विरुध्द पक्षकार |
| **कोरमः-** १.श्रीमती पुष्पा सु. तावडे, अध्यक्ष<br>२.श्री. राजेंद्र ल.हजारे, सदस्य सचिव,<br>३. श्री. प्रशांत श. पुजारी, ग्राहक सदस्य, | |

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संक्षिप्त गा-हाणे**

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रादार यांची अरविंद कॉटसिन (इंडिया ) लि. या नांवे प्लॉट क्र. १२ फेज-II सेक्टर -II लक्ष्मी औद्योगिक वसाहत ,तिळवणी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांची ही कंपनी आहे. यासाठी त्यांच्या नांवे उच्च दाब औद्योगिक (HT-1A) हे वीज कनेक्शन असून त्याचा ग्राहक क्र. २५०४९९३०४८४२ असा आहे. तक्रारदारांनी आवश्यक तो सर्व तपशील आपल्या तक्रार अर्जाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदाराने सदर वीज कनेक्शनकरिता महावितरणच्या नियमाप्रमाणे आवश्यक ती सुरक्षा अनामत रु. ७३,१७,०००/- ठेवलेली होती. त्यानंतर ग्राहकाच्या विनंती अर्जानुसार महावितरण, नियमाप्रमाणे सदर सुरक्षा अनामत रक्कमेची पुर्ननिधारण होऊन मा. अधीक्षक अभियंता कोल्हापूर यांचे पत्र क्र. ६७०३ दिनांक २५.०८.२०१६ द्वारे मागील १२ महिन्यातील अर्थात आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या सरासरी वीज बिलाच्या आधारे सुरक्षा अनामत रक्कम रु. ४६,००,०००/- इतकी निश्चित करण्यात आली व त्यांनी सदर रक्कमेची रु. ४६.०० लाख रक्कमेची बँक गॅरटी दि. २६.०९.२०१६ रोजी सादर केली (वैधता कालावधी दि. २०.०९.२०१६ ते २०.१२.२०१८) या कालावधाची बँक गॅरंटी वैधता पुर्ण होण्या आधीच म्हणजे दि. २८.०५.२०१८ रोजी सदर सुरक्षा रक्कमेची पुर्ननिधारण होण्याकरीता आवश्यक तो तपशील सादर करुन रु. २७.०० लाख इतक्या सुरक्षा अनामत रक्कमेस मंजूरी मिळावी म्हणून प्रस्ताव सादर केला.

तक्रारदाराच्या पत्रव्यहारास अनुसरुन अधीक्षक अभियंता , कोल्हापूर यांनी त्यांचे पत्र क्र. ५२९६ दिनांक ०४.०६.२०१८ अन्वये रु. ३२.०० लाख इतकी सुरक्षा रक्कम भरणेस परवानगी दिली. यानंतर अधीक्षक अभियंता कोल्हापूर यांनी रु. ४६.०० लाख इतकी बँक गॅरंटी भरण्यास कळविले तक्रारदारांनी सप्टेंबर २०१८ च्या देयकामध्ये सुरक्षा अनामत रक्कम काहीच नसल्याचे दर्शवून रक्कम रु. २६,२२,०००/-येणे दर्शविली त्याला अनुसरुन दिनांक २२.१०.२०१८ रोजी रु. ४६.०० लाखाची बँक गॅरटी दिली असून त्याची वैधता दि. २०.१२.२०१८ पर्यन्त आहे. सप्टेंबर २०१८ च्या देयकानुसार रु. २६,२२,०००/- इतक्या रक्कमेचा स्वतंत्र भरणा आर.टी.जी.एस.द्वारे मुदतीपूर्वी भरणार असलेबाबत अधीक्षक अभियंता ,कोल्हापूर यांना कळविले.

यानंतर अधीक्षक अभियंता कोल्हापूर यांनी त्यांचे पत्र क्र. ११०२१ दिनांक ०६.१२.२०१८ अन्वये ओपन ॲक्सेस ग्राहक असल्याचे दर्शवून सुरक्षा अनामत रक्कम पुनरावलोकनास नकार दिला. तक्रारदाराने प्रशासकिय अडचण टाळण्यासाठी रु. ४६.०० लाख इतके रक्कम दि. २०.१२.२०१८ रोजी आर.टी.जी.एस.द्वारे अंडर प्रोटेस्ट जमा केली. तक्रारदारांनी मुख्य अभियंता वाणिज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. ३११ दि .०१.१०.२०१८ अनु.क्र. ४ व ५ तसेच ओपन ॲक्सेस ॲग्रीमेंट मधिल मुद्दा २(ए), २(सी) व मुद्दा २(डी ) या मुद्यांचा उल्लेख करुन अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर मंडल कार्यालय , कोल्हापूर यांच्याकडे दिनांक ३१.१२.२०१८ रोजी तक्रार दाखल केली असता सदर कक्षाने ओपन ॲक्सेस ॲग्रीमेंट मधिल मुद्दा २ (डी) यांचा विचार न करता फक्त मुद्दा क्र. २ (सी) चा संदर्भ लावून सदर कक्षाने तक्रार नामंजूर केलेली आहे. सबब तक्रारदार कंपनीने सदर तक्रार अर्ज 'अ' मध्ये दिनांक १५.०४.२०१९ रोजी दाखल केली. ग्राहकाने महावितरणच्या खालील परिपत्रकाकडे लक्ष वेधले.

मुख्य अभियंता, वाणिज्य , मुंबई यांचे परिपत्रक क्र. ३११ दि. ०१.१०.२०१८ मधिल मुद्दे

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

MSEDCL shall re-calculate the amount of Security Deposit payable, based on the actual billing of the consumer, once in each financial year .

Where the amount of Security Deposit maintained by the consumer is higher than the security required to be maintained under the Supply Code Regulations, the Distribution Licensee shall refund the excess amount to the consumer in a singal instalment.

तसेच Open Access Regulation २०१६ मधील खालील तरतूदीकडे लक्ष वेधले.

२.०(ए) (दीर्घ -मध्यम) कालीन मुक्त प्रवेश पक्षकार, राज्यातंर्गत पारेषण यंत्रणा आकार/एमएसएलडीसी आकार, क्रॅास-सबिसिडी अधिभार अतिरिक्त अधिभार आणि आयोगाकडून निश्चित करण्यात आलेला अन्य कोणत्याही आकारांसह आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विनियम/वीज दराच्या आदेशानुसार वहन आकार विभागून घेतील आणि अदा करतील. हे आकार त्यांचा प्रत्यक्ष वापर केव्हांही सुरु झाला तरी परिशिष्ट-१ मध्ये निर्देशित केल्यानुसार मुक्त प्रवेशाच्या निर्धारित दिनांकापासून लागू होतील.

(सी):- वर २(ए) मध्ये नमूद केलेल्या आकारांसाठीच्या अंदाजित सरासरी मासिक देयकाच्या १०५ टक्के रक्कमेसाठी एक लेटर ऑफ क्रेडिट (एलसी) उघडण्या व्यतिरिक्त (दीर्घ-मध्यम) कालिन मुक्त प्रवेश पक्षकार, परिशिष्ट-१ मध्ये निर्देशित केल्यानुसार मुक्त प्रवेशाच्या निर्धारित दिनांकाच्या तीन महिन्यापूर्वी अंदाजित दोन महिन्याच्या सरासरी मासिक देयकाच्या सममूल्य इतकी, एक परत न घेता येण्याजोगी बँक हमी (बीजी) इतकी सुरक्षा , नोडल एजन्सीच्या नावे देतील. सुरुवातीला ही सुरक्षा हमी कमीत कमी तीन (३) वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहिल आणि पुढे मुक्त प्रवेशाच्या कालावधी संपेपर्यन्त वेळोवेळी या सुरक्षा हमीचे नूतनीकरण करण्यात येईल. (मध्यम- कलिन मुक्त प्रवेशासाठी ही बँक हमी मुक्त प्रवेशाच्या कालावधी संपेपर्यन्त वैध राहिल)

(डी):- अंदाजित सरासरी मासिक आकारांचा आढावा दर वर्षी घेण्यात येईल आणि त्यानुसार (दीर्घ-मध्यम) कालिन मुक्त प्रवेश पक्षकार, सुरक्षा हमीची रक्कम वाढवतील/कमी करतील.

## वितरण कंपनीची भूमिका

मंचाने त्यांच्या पत्र क्र. EE/KOPZ/CGRF/Case No.०९/२०१९-२०/८२ दिनांक १८.०४.२०१९ च्या पत्राने तक्रारदाराचया दि. १८.०४.२०१९ च्या तक्रार अर्जा संदर्भात महाराष्ट राज्य वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या विनियम क्र. ६.१३ नुसार या तक्रार अर्जानुसार महावितरणचे म्हणणे आवश्यक त्या कागदपत्रासहित हे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आत मंचाकडे सादर करण्यास सांगितले महावितरणने अधीक्षक अभियंता (कोमं) कोल्हापूर मंडल यांचे जावक क्र. SE/KC/T/५३०९ दिनांक १५. ०६.२०१९ च्या पत्राने त्यांचे स्पष्टीकरण या मंचास सादर केले, ते खालील प्रमाणे आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

प्रस्तुत नोटीस प्राप्त झालेनंतर विज वितरण कंपनीने हजर होऊन दि. १५.०६.२०१९ रोजी आपले लेखी म्हणणे अधीक्षक अभियंता (कोमं) कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर यांचे मार्फत दाखल केलेले असून त्यात तक्रारदारांची संपूर्ण मागणी नाकारलेली आहे. विरोधी पक्ष कंपनीचे म्हणणे पुढील प्रमाणे आहे.

1.Arvind Cotsyn (India ) Ltd is HT Open Access MTOA Consumer of MSEDCL bearing Consumer No.250499304842 at Plot No.12 Laxmi Co-op Estate Ichalkarnji having contract demand of 2400 KVA.

2. Initially the consumer has granted the permission for Medium –Term Open Access for the period of 01.04.2016 to 31.03.2019

3. Regulation 2.01 (28) of MERC(DOA) Regulation 2016 defines the term open Access agreement as

"Open Access Agreement" means an agreement for use of the Distribution System of Distribution Licensee for Medium and Long Term Open Access

(i) entered into between the Distribution Licensee and a person whose premises are situated within its area of supply, where such person requires supply of electricity from a Generating Company or Licensee other than that Distribution Licensee; or

(ii) entered into between the Distribution Licensee and a Generating Company or another Licensee for the purpose of giving supply of electricity to such person as referred to in (i) above by using the Distribution System of the Distribution Licensee for wheeling of electricity; or

(iii) entered into between the Distribution Licensee and a person whose premises are situated within its area of supply, where such person requires supply of electricity from a Power Exchange, established under the relevant MERC Regulations;

in accordance with these Regulations;

4. **Regulation 6.1 of MERC(DOA) Regulation 2016 provides that *An Open Access Agreement shall be entered into upon grant of Medium or Long Term Open Access in the format provided in the Annexure V.*** Therefore the format of Agreement is prescribed in the Regulation and the Agreement was executed between the parties as per the said format.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

5. It is submitted that in the Agreement at Clause No. 2.0(c) wherein it is provided that *" In addition to opening of LC for 105% of estimated average monthly billing for charges mentioned at 2(a) above[Long/Medium]Term Open Access party would provide security in the form of irrevocable Bank Guarantee (BG) in favour of Nodal Agency,* ***equivalent to two months estimated average monthly billing, three months prior to the scheduled date of Open Access*** *as indicated at Annexure-I. The initially the security mechanism shall be valid for a minimum period of three years and shall be renewed from time to time till the expiry of the open Access"*

Further the Clause (d) of the Agreement provides that the estimated average charges would be reviewed every year and accordingly the amount of security would be enhanced/ reduced by [Long/Medium] Term Open Access Parties. Accordingly, initially the security deposit of Rs. 76,00,000/- was taken from consumer. Afterwards as per the consumption of consumer it was reduced to Rs. 46,00,000/- as per provisions 2.0(d) of the agreement.

6. **Regulation 25 of the DOA Regulations, 2016 provides for a payment security mechanism and it provides that "The Applicant for Long-term or Medium-term Open Access shall open an irrevocable revolving Letter of Credit in favour of the Nodal Agency to the extent of the estimated amount of the various charges payable for a period of two months."**

Therefore the clause for providing two months estimated average monthly billing seems to be incorporated in the agreement as per the provision of Regulation 25 of (DOA) 2016

7. Therefore Considering the Regulation 25 it clears that open Access consumer is liable for the payment towards the Security mechanisms as per the Agreement executed between the parties.

8. Regulation 14.9 of DOA Regulation 2016 provides for the payment of additional Security Deposit for wheeling equivalent to one month's billing for Wheeling Charge, Cross-Subsidy Surcharge and Additional Surcharge on the charges of wheeling, calculated in accordance with the terms and conditions of the Open Access Agreement:

Therefore as per Regulation 14.9the consumer is also liable for payment of additional security deposit amount in addition to payment of security as prescribed in Regulation 25 of DOA Regulation 2016. .

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

9. It is submitted that complainant consumer has granted the open access permission as per the provisions of DOA Regulation 2016. The said Regulation itself provides for the payment of security mechanism therefore it is not acceptable that the contention of the complainant that he shall be liable for payment of SD amount as per the provisions of MERC(Conditions of Supply ). The Agreement was executed between the parties as per the provisions of DOA Regulation 2016. Therefore the provisions of MERC DOA Regulation 2016 will prevail over the provisions of MERC(Conditions of Supply)2005. Hence the open access consumer is liable for the payment of SD amount to the extent of the estimated amount of the various charges payable for a period of two months.

10. Consumer has granted the open access permission on 01.04.2016 therefore MSEDCL has calculated the SD amount by considering the consumption for the month of Nov & December 2015 i.e. three months prior to the date of open access permission as per the clause 2.0(C) of the Agreement. The Complainant Consumption for the month Nov 15 & Dec 2016 is Rs. 90.96 lakhs and hence MSEDCL has calculated the SD amount of Rs. 46.00 Lakhs.

11. It is pertinent to note that consumer has not disputed about previous demand of SD amount which was raised for two months as per the agreement.

12. It is submitted that MSEDCL has calculated the SD amount as per the provisions of DOA Regulation 2016 and agreement executed between the parties. Hence Complaint is liable to be dismissed.

Therefore it is humbly prayed that

a. The present complaint is not having any merit factually as well as lawfully therefore it may kindly be dismissed.
b. Any other just and proper order be passed in favour of the respondent.

## सुनावणी व त्या दरम्यानचा युक्तीवाद

या प्रकरणाची सुनावणी दि. २१.०९.२०१९ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार मे. अरविंद कॉटसिन (इंडिया) मर्या. यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून श्री युधिष्ठीर रामदेव वर्मा आण वि.प. कंपनीतर्फे श्री सागर मारुलकर कार्यकारी अभियंता(कोमं) कोल्हापूर हे हजर होते . त्यांचा तोंडी युक्तीवाद ऐकणेत आले. तसेच उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली.

सुनावणी दरम्यान तक्रारदरांनी तक्रार अर्जाचा नमुना 'अ' मध्ये नमूद केलेल्या मुद्दयांचे व लिखित अभिवेदनाच्या अनुषंगाने खालील मुद्दे मांडले.

नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम २००५ मधिल कलम ११ अंतर्गत सुरक्षा अनामत रक्कमेबाबतच्या पुढील तरतूदी आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

११.४ वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षात एकदा ग्राहकांना देण्यात आलेल्या प्रत्यक्ष देयकांच्या आधारे सुरक्षा रक्कमेची फेर परिगणना करेल.

११.५ ग्राहकाने ठेवलेली सुरक्षा अनामतीची रक्कम त्याने विनियम ११ नुसार ठेवावयास हव्या असणा-या सुरक्षेच्या रक्कमेपेक्षा जास्त असल्यास, सुरक्षा अनामतीची अशी जादा असलेली रक्कम वितरण परवानाधारक ग्राहकास एक रक्कमी परत करेल.

मा. मुख्य अभियंता(वितरण) यांचे वाणिज्य परिपत्रक क्र. ३११ दि. ०१.१०.२०१८ मधील सुरक्षा अनामत बाबतच्या तरतूदी आणि ओपन ॲक्सेस ॲग्रीमेंट मधील कलम २ (डी) मधील तरतूदीच्या अधीन राहून, ज्याचा तपशील मुळ अर्जामध्ये दिलेला आहे, अर्जादार प्रतिवर्षी सुरक्षा अनामतीची पुनर्निर्धारणा होवून सुरक्षा अनामत रक्कम एकरकमी परत मिळणेस पात्र आहेत.

अर्जदारांचे वर्ष-२०१८-१९ मधील वीज बिलाच्या रक्कमेचा तक्ता व वीज देयकांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत( परिशिष्ट-२) त्याचप्रमाणे अर्जदारांचा वर्ष-२०१८-१९ च्या वीज बिलांची रक्कम सरासरी रु. २१.५७ लाख इतकी होते. त्यामध्ये १० टक्के वाढ केल्यास अर्जदारांची सुधारीत सुरक्षा अनामत रक्कम रु. २३.७३ लाख इतकी होत आहे. मात्र अर्जदारांचेकडून रु. ४६.०० लाख इतकी सुरक्षा अनामत वसूल करुन ती परत करण्यास नकार देण्यात आलेला आहे. अर्थात अर्जदार रु. २२.२७ लाख इतकी सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेस पात्र आहे.

जादा वसूल सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत सव्याज परत करण्याविषयी आदेश पारीत करण्यात यावेत, ही विनंती.

यानंतर महावितरण प्रतिनिधीने दि. १५.०६.२०१९ च्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने खालील मुद्दे मांडले.

महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोगाने (दिर्घ-मध्यम) कालीन मुक्त प्रवेश पक्षकारासाठी MERC(DOA) Regulation 2016 मध्ये जे नियम केले आहेत, त्यानुसार तक्रारदारांना Open access साठी मंजूरी दिली . त्याचा प्रथम कालावधी दि. ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१९ असा होता. या Regulation 2016 मधील २.०१(२ सी) नुसार व Regulation 6.1 मध्ये नमूद केलेल्या व देण्यात आलेल्या परिशिष्ट ५(V) नुसार ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. याबाबतची माहिती सविस्तर लेखी निवदनामध्ये दिलेली असून ॲग्रीमेंट प्रत सादर करणेत येत आहे. सदरचे ॲग्रीमेंट Regulation 2016 नुसार झालेले असून त्यातील सर्व अटी व Regulation 2016 हे Open access पक्षकाराना बंधनकारक असलेने अनामत रक्कमेबाबत Condition of supply 2006 नुसार MERC ने नियम व त्याच प्रमाणे वाणिज्य परिपत्रक क्रमांक ३११/०१.११.२०१८ या मधिल तरतूदी लागू पडत नाहीत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

विज नियामक आयोगाच्या DOA Regulation 2016 मधिल ६.१ या तरतूदीनुसार तक्रारदारांनी ॲग्रीमेंट केलेले आहे. त्यामध्ये Regulation मधिल सर्व अटींचा समावेश आहे. त्यानुसार महावितरण कंपनीने सुरक्षा रक्कम निश्चित केली आहे ती बरोबर आहे.

२(ए) नुसार (दिर्घ-मध्यम) मुक्त प्रवेश पक्षकार यांनी wheeling charges रेग्युलेशन/टॅरिफ ऑर्डर नुसार इतर आकारासह open access च्या पहिल्या दिवसापासून भरावयाचे आहेत. आणि २(सी) मध्ये असे नमूद आहे की, २(ए) मधिल तरतूदी व्यतिरिक्त (In addition to opening LC for 105% of estimated average monthly billing for charges mentioned at 2(a) above ) (दीर्घ-मध्यम) मुक्त प्रवेश पक्षकार (medium - Term open access) यांनी मुक्त प्रवेशाच्या निर्धारीत दिनांकापासून नमूद केलेनुसार सरासरी रक्कम निश्चित केली जाईल व ही सुरक्षा हमी कमीत कमी तीन वर्षासाठी राहिल आणि पुढे मुक्त प्रवेशाच्या कालावधी संपेपर्यन्त वेळोवेळी या सुरक्षा हमीचे नुतनीकरण करण्यात येईल. मात्र (मध्यम-कालीन मुक्त) प्रवेशसाठी ही बॅंक हमी मुक्त प्रवेशाचा कालावधी संपे पर्यन्त वैध राहिल. या तरतूदीनुसारच सुरक्षा हमी रक्कम निश्चित केली आहे ती बरोबर आहे.

तक्रारदारांनी २ (डी) चा उल्लेख करुन दरवर्षी सुरक्षा हमीचा आढावा घ्यावा ही मागणी चुकीची असून २ (डी) मध्ये "अंदाजीत सरासरी मासिक आकारांचा आढावा दरवर्षी घेण्यात येईल म्हणजे २ (ए) मध्ये नमूद चार्जेसचा आढावा दरवर्षी घेऊन ती रक्कम वाढवता/ कमी करता येईल. महावितरण कंपनीने २ (ए) नुसार घ्यावी . लागणारी सुरक्षा हमी सुरवातीला रु. ७६.०० लाख घेतली असून नंतर त्यामध्ये बदल करुन वीज वापरानुसार २ (ए) प्रमाणे रु. ४६.०० लाख इतकी करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे लिखित दिलेल्या निवेदनामध्ये DOA Regulation 2016 मधील Regulation 25 व 14.9 मध्ये अनुक्रमे २ महिन्याची सुरक्षा हमी तसेच wheeling charges व त्यावरील Cross subsidy surcharges & additional surcharges १ महिण्याची घेण्याची तरतूद आहे. यावरुनही महावितरण कंपनीने निश्चित केलेली सुरक्षा हमी ही योग्य व नियमानुसारच असलेने तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात यावी, असे स्पष्ट केले.

मूळ तक्रार मंचापुढील विचारार्थ मुद्दे अर्ज, सादर पत्रव्यवहार, उभयपक्षाने सुनावणी दरम्यान केलेल्या युक्तिवाद, उपलब्ध पत्र व दस्तऐवज यांचा एकत्र विचार करता मंचासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराची मागणी योग्य व मंजूर होण्यास पात्र आहे का? | नाही |
| २ | अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

## कारणमिमांसा

तक्रारदार हे उच्च दाब औद्योगिक (HT-1-A) ग्राहक असून त्यांच्या मागणीनुसार मध्यम कालीन मुक्त प्रवेश पक्षकार (Medium Term open access) म्हणून दि. ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१९ या कालावधीसाठी मान्यता दिली. विज नियामक आयोग रेग्युलेशन (DOA) २०१६ नुसार अॅग्रीमेंट केले.

तक्रारदाराने अधीक्षक अभियंता कोल्हापूर पत्र क्र. ६७०३ दि. २५.०८.२०१६ नुसार रु. ६४.२५ लाख ऐवजी रु. ४६.०० लाख रक्कमेची बॅक हमी दि. २६.०९.२०१६ च्या पत्रान्वये सादर केली. याचा वैधता कालावधी दि. २०.०९.२०१६ ते २०.१२.२०१८ असा आहे. कालावधी पूर्ण होण्या आधिच तक्रारदाराने दि. २८.०५.२०१८ रोजी सुरक्षा रक्कमेची पुनर्निधारण होणेसाठी अर्ज व कागदपत्रे सादर करुन रु. २७.०० लाख इतक्या सुरक्षा रक्कमेचा प्रस्ताव दिला. याला अनुसरुन महावितरण कंपनीने रु. ३२.०० लाख भरणेची परवानगी दि. ०४.०६.२०१८ च्या पत्राने दिली .

महावितरण कंपनीने दि. १५.१०.२०१८ रोजी तक्रारदारांना नविन बॅक गॅरटी सादर करण्यासाठी कळविले . कारण दि. २०.१२.२०१८ रोजी बॅक हमी ची मुदत संपत होती. तसेच महावितरण कंपनीने ओपन अॅक्सेस ग्राहक असलेने सुरक्षा हमी रक्कम पुनवरालोकनास नकार दिला. तसे दि. ०६.१२.२०१८ च्या पत्राने तक्रारदारास कळविले. तक्रारदाराने महावितरण कंपनीची प्रशासकिय अडचण टाळण्यासाठी रु. ४६.०० लाख इतक्या रक्कमेचा दि. २०.१२.२०१८ रोजी RTGS द्वारे अंडर प्रोटेस्ट भरणा केला.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदारांनी वाणिज्य परिपत्रक क्र. ३११ दि. ०१.१०.२०१८ मधील अनामत रक्कमेच्या तरतूदीनुसार व ओपन ॲक्सेस मधिल कलम २(डी) मधील तरतूदीनुसार प्रतिवर्षी सुरक्षा अनामत रक्कम पुनर्निर्धारण होऊन जादा असलेली रक्कम एक रक्कमी परत मिळणेस पात्र असलेबाबत व विज नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी नियिम २००५ मधिल कलम ११ अंतर्गत सुरक्षा अनामतीची रक्कम, प्रत्येक आर्थिक वर्षात एकदा ग्राहकांना देण्यात आलेल्या प्रत्यक्ष देयकाच्या आधारे फेर गणना करणेस व ग्राहकाने ठेवलेली सुरक्षा रक्कम ही जास्तीची असल्यास जादा रक्कम वितरण परवाना धारक ग्राहकांस एक रक्कमी परत करणेबाबत तरतूद असल्याने जादा सुरक्षा रक्कम मिळण्यास पात्र असलेचे सांगितले. परंतु तरी तक्रारदारांनी विज नियामक आयोगाच्या Distribution open access (DOA) Regulation 2016 मधिल इतर तरतूदींचा विचार केला नाही. तक्रारदारांनी (DOA) Regulation 2016 मधिल तरतूदीनुसार ॲग्रीमेंटही केले आहे. त्या व्यतिरिक्त तक्रारदारांनी कोणताही मुद्दा उपस्थित केलेला नाही.

MERC (DOA) Regulation 2016 मध्ये २.०१(२८) Open access agreement ची माहिती देऊन ६.१ कलमानुसार दिलेल्या परिशिष्टमध्ये ॲग्रीमेंट केले आहे. यानुसार तक्रारदार हे मध्यम -कालीन पक्षकार आहेत हे सिध्द होते. व त्याला अनुसरुन असणा-या कलम २ (सी) नुसार **"कलम २(ए) व्यतिरिक्त मध्यम मुक्त प्रवेश पक्षकार (Medium term open access) मुक्त प्रवेशाच्या निर्धारित दिनांकाच्या तीन महिन्यापूर्वी अंदाजित दोन महिन्याच्या सरासरी मासिक देयकांच्या सममुल्य इतकी एक परत न घेता येण्याजोगी बॅक गॅरटी हमी (बीजी) इतकी सुरक्षा देईल. ही सुरक्षा तीन वर्षासाठी वैध राहिल व मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी ही बॅक हमी मुक्त प्रवेशाच्या कालापर्यन्त संपेपर्यन्त वैध राहिल"** या कलमा सोबतच ओपन ॲक्सेस Regulation २०१६ मधिल Regulation 25 व 14.9 चा विचार करता महावितरण कंपनीने निश्चित केलेली सुरक्षा रक्कम योग्य आहे.

तसेच Open access पक्षकारासाठी MERC (DOA) Regulation 2016 हे निश्चित केले असलेने, त्यामधिल कलमांचाच विचार करणे आवश्यक ठरत असलेने वर नमूद केलेल्या मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी येत असल्याचा निष्कर्ष मंचाने काढला आहे.

सदर प्रकरणात मंचाचे पदाधिकारी बदली होणे, यामुळे तक्रार दोन महिन्याच्या वैधानिक कालावधीत निर्णयाप्रत येवू शकली नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## आदेश

१) तक्रारदाराचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

19-10-2019     19.10.2019     19.10.2019

(श्री प्रशांत श.पुजारी)     (श्री राजेंद्र ल.हजारे)     (श्रीमती पुष्पा सु. तावडे)
ग्राहक सदस्य     सदस्य सचिव     अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण